# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

( सकाळ )

जा.क्र.२३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०४/२०१७

**१) मुलीवर अत्याचार करुन तिची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

माहे ०५/२०१४ व माहे ०७/२०१४ दरम्यान यातील फिर्यादी पिडीत मुलगी व आरोपी हे एकाच वस्तीतील राहणारे असुन फिर्यादी व आरोपी भिन्न जातीचे आहे. असे आरोपीला माहित असुन सुध्दा दोघा मध्ये सन २०१४ पासुन प्रेम संबंध आहेत तिला प्रेम संबंधातुन लग्नाचे आमीष दाखवुन तिचेशी माहे ०५/२०१४ व माहे ०७/२०१४ मध्ये असे दोनदा लैगींक अत्याचार करुन नंतर लग्नास टाळाटाळा करुन तिची फसवणुक केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७६(२)(न),४१७ भांदवि. सहकलम ३(२)(५)अ.जा.ज.अ.प्र.का. सन १९८९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास श्री. विक्रम साळी एसडीपीओ तुमसर हे करीत आहे.

**२) घरातील दाराचा कडी तोडुन आत प्रवेश करुन आलमारीतील सोण्याचे व चांदीच्या दागीण्यांची चोरी . :—**

दिनांक ०१/०४/२०१७ चे ०९.०० ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी चुडामन घनशामजी रहांगडाले वय ५८ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी हे दिनांक ०१/०४/२०१७ चे ०९.०० वा. गाबखारा मध्य प्रदेश येथे मैय्यती करीता गेले होते व १८.०० वा. सुमारास घरी परत आले असतांना यातील फिर्यादीचे घराचे मागील दाराची कडी कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या आलमारीतील सोण्याची पोत ५ तोळे, सोण्याचे कानातील डुल ३ ग्रॅम, सोण्याची १ अंगठी ३ ग्रॅम, चांदीची पायल १०० ग्रॅम, चांदीचे ५ कडे ६० ग्रॅम, व नगदी ८५००/—रु. असा एकुण १,८७,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

**३) मोटार सायकल स्लीप होवुन खाली पडुन डोक्याला मार लागल्याने स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०४/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सहजाद मुस्तकीन शेख उम्र वय १७ वर्ष, रा. लालालचपतरॉय वार्ड मेंढा भंडारा हा आपले मृतक काका सोबत जवाहरनगर येथे एसटी फिटींगच्या कामाने मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्हि १२९३ ने जात असतांना यातील आरोपी मृतक मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन अचानक ब्रेक मारल्याने मोटार सायकल स्लीप होवुन खाली पडुन डोक्याला मार लागल्याने आरोपी मोटार सायकल चालक हा स्वत:चे मरणास व फिर्यादीस किरकोळ मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे. पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**४) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन हाताबुक्यांनी मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०३/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचा मुलगा असुन फिर्यादीचा पुतण्या सचीन बांते यांची लहान मुलगी फिर्यादीचे घरी हजर असतांना आरोपीने हया पोरीला आमचे घरी येवुन देवु दिले नाही असे म्हणुन फिर्यादी आई सोबत भांडण करुन हाताबुक्यांनी नाकावर मारुन नाकाचा हाड फॅक्चर केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२५ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

५) अवैध दारु अड्यांवर धाडी . :-

दिनांक ०१/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी येथे अवैध दारू अड्यांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन किंमती २४००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

नियंत्रण कक्ष अधिकारी 2/4/2017
भंडारा
दुरध्वनी क्र. ९४२१०८२०२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.